राज्यातील बैलगाडी शर्यतीबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक- पविआ-१०१७/प्र.क्र.१६२/पदुम-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- १० नोव्हेंबर, २०१७

वाचा :- (१) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ , दिनांक ३१ जुलै, २०१७.
(२) शासन परिपत्रक, कृषि व पदुम विभाग, समक्रमांक, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७.
(३) शासन अधिसूचना, कृषि व पदुम विभाग, क्र. पविआ-१०१७/प्र.क्र.६१/भाग-१ / पदुम-३, दिनांक- १० नोव्हेंबर, २०१७

शासन परिपत्रकः-

राज्यात बैलगाडी शर्यतीस परवानगी देण्यासाठी, केंद्र शासनाच्या **प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०**, मध्ये "सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५" अन्वये सुधारणा करण्यात आली असून, सदर अधिनियम दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी राज्य शासनाच्या राजपत्रात प्रख्यापित करण्यात आला आहे. तथापि, उक्त "सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५" च्या कलम ३८ (ख) मधील तरतूदीनुसार, राज्यात बैलगाडी शर्यतीस परवानगी देण्यासंदर्भात नियम विहीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. त्यामुळे जो पर्यंत यासंदर्भातील आवश्यक ते नियम विहीत करुन, राजपत्रात अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात येत नाहीत, तो पर्यंत राज्यात बैलगाडी शर्यती आयोजित करता येणार नाही.

२. दरम्यान, उक्त अधिनियमातील तरतूदींविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका (स्टॅम्प क्र. २३१३२ / २०१७) दाखल करण्यात आली असून, सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने दिनांक- १६.०८.२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी झाली. सदर सुनावणीच्या वेळी उक्त याचिकेच्या अनुषंगाने पुढील आदेश होईपर्यंत राज्यातील कोणत्याही भागामध्ये शर्यतीच्या आयोजनास परवानगी देण्यात येऊ नये, असे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

३. सबब, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) मधील तरतूदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी पुढील आदेश होईपावेतो बैलगाडी शर्यतीस परवानगी देऊ नये, असे निर्देश संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेले आहेत.

४. आता, संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ च्या अधिसूचनेन्वये बैलगाडी शर्यतीस परवानगी देण्याबाबत अंतीम नियम राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले असले तरी वर नमूद परिच्छेद क्र. २ येथील जनहित याचिका (स्टॅम्प) क्र. २३१३२ / २०१७ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक ११.१०.२०१७ रोजी खालीलप्रमाणे अंतरीम आदेश दिलेले आहेत:-

Prima facie, since the Apex Court made the observations that from conducting the bullock cart race subjecting the bullock to such races, which is not anatomically designed for such race would mean subjecting animals to pain and suffering, we are of the opinion that till the matter is disposed of on merits, the bullock cart races will not be conducted within the State of Maharashtra and no such permission can be granted by any of the authorities, even after notifying the proposed rules.

५. सबब, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) तसेच संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ च्या नियमामधील तरतूदीनुसार **संबंधित जिल्हाधिकारी यांनी पुढील आदेश होईपावेतो बैलगाडी शर्यतीस परवानगी देऊ नये.**

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याच्या संकेतांक २०१७१११०१५५६५१३४०१ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2017.11.13 10:31:34 +05'30'

(विकास तु. कदम)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त पशुसंवर्धन, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे.
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
६. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व उप आयुक्त पशुसंवर्धन
९. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१०. सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
११. निवड नस्ती (पदुम-३)